# भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रीयांचे स्थान

**प्रा. डॉ. सुनिल संभाजी साठे,**
श्रीमती विजयादेवी देसाई सि. कॉलेज,
दौलतनगर, (मरळी) ता. पाटण
drsunilsathe@gmail.com

**गोषवारा:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रीयांचे स्थान कसे होते. तसेच प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडामध्ये भारतीय समाजव्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा व जबाबदार घटक असलेला स्त्री वर्ग, धार्मिक रुढी, प्रथा, परंपरा आणि पुरुषी वर्चस्वामुळे कशाप्रकारे आपल्या हक्क, अधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्यापासून शोषित व उपेक्षित राहीला यावर अधिक भर देऊन त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायावर प्रकाश टाकण्याचे कार्य शोधनिबंधाच्या माध्यमातून प्रयत्न केला आहे. आधुनिक काळखंडामध्ये स्त्रीया चूल आणि मूल यातून बाहेर पडून पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करतात. असे असले तरी त्यांच्यावरील अन्याय कमी होण्यापेक्षा त्यामध्ये वाढ होताना दितस आहे. स्त्री व पुरुष ही दरी पूर्ण संपुष्टात आलेली दिसत नाही. या सर्व बाबींचा अभ्यास या शोधनिबंधात करण्याचा प्रमाणिकपणे प्रयत्न केला आहे.

**कळीचे शब्द:** प्राचीन, समाजव्यवस्था, प्रथा, पुरुषी वर्चस्व, शोषित व उपेक्षित...

**प्रस्तावना:**

जेव्हा निसर्गाने प्राणीविश्वात नर आणि मादी या दोन जाती निर्माण केल्या तेव्हा निसर्गात वरिष्ठ व कनिष्ठ असा भेदभाव नव्हता. कारण ती विषमता निसर्गनिर्मित नव्हती तर ती समाजनिर्मित होती व आहे. समाजपूर्व प्राथमिक अवस्थेत अशी विषमता नव्हती. अगदी टोळी अवस्थेत सुद्धा नव्हती. स्त्रीयांना सामाजिक व कौटुंबिक जीवनात मुलगी, पत्नी, आई, सून, बहिन, सासू, मावस बहिण, मावशी, आज्जी, आत्त्या, माती अशा अनेक भूमिका पार पाडाव्या लागत. त्यामुळे कुटुंब व समाज या क्षेत्रात स्त्रीचे स्थान महत्वाचे आहे. परंतु हे स्थान प्राप्त करण्यासाठी स्त्रीला खूप मर्यादित स्वातंत्र्य होते. तिला कसल्याही प्रकारचे आर्थिक स्वातंत्र्य नव्हते. तत्कालीन काळखंडामध्ये मुलीच्या जन्मापेक्षा मुलाच्या जन्मास फार मोठे महत्व होते. तत्कालीन भारतीय स्त्री हि भारतातील अनेक अनिष्ठ चालीरीती, रुढी, प्रथा, परंपरा यांच्या बळी ठरल्या होत्या. सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, बालविवाह, बालविधवा म्हणून जगावे लागणारे जीवन, बाल जरठ विवाह, नियोग, जोहार, केश वफन अशा अनेक अनिष्ठ रुढीमुळे स्त्रीयांचे जीवन पशूपेक्षाही हिन दिन झाले होते. समाजातील एक भोगवस्तू म्हणूनच तिच्याकडे पाहिले जात होते. एवढेच नव्हे तर संसार-प्रपंचाचा गाडा, कुटुंबातील धुनी, भांडी, उष्टी, केर-कचरा इत्यादी सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळून घरातील वडिलधाऱ्या व कर्त्या पुरुष मंडळींना शेतीच्या अवजड कामातही हातभार लावणारी स्त्री ही जगातील लोकसंख्येच्या प्रमाणात निम्मी आहे. अशा या समाज जीवनाचे ८०% प्रापंचीक चक्र विना तक्रार चालवणारी भारतीय स्त्री समाजव्यवस्थेमध्ये नेहमीच शोषीत उपेक्षित व दुर्लक्षित राहिली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय समाज व्यवस्थेमध्ये तीचे स्थान, दशा व दिशा याचा अभ्यास होणे महत्वाचे व गरजेचे आहे. म्हणून त्याचा थोडक्यात आढावा या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. या शोध निबंधात पुढील उदिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

1. प्राचीन भारतीय स्त्री जीवनाचा आढावा घेणे.
2. समाजव्यवस्थेतील स्त्रीयांचे स्थान यांचा अभ्यास करणे.
3. समाजजीवनावर स्त्रीयांच्या कार्याचा झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची गृहितके**:

1. अनिष्ठ चालीरीतीमुळे प्राचीन भारतीय स्त्रीयांचे सामाजिक स्थान व स्वातंत्र्य धोक्यात आले होते.
2. समाजव्यवस्थेतील एक जबाबदार व महत्वाचा घटक असूनही स्त्री या शोषित व उपेक्षित राहिल्या.
3. समाजिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडूनही स्त्रीयांच्या कार्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते.

**संशोधन पद्धती**:

संबंधीत संशोधन कार्यात तथ्य संकलन करण्यासाठी ऐतिहासिक पद्धती तसेच दुय्यम स्त्रोत याचा आधार घेण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासाला उपयुक्त ठरेल असे विविध संशोधन सहित्य, मासिके, संदर्भग्रंथ, पाक्षिके, वर्तमान पत्र व इंटरनेटचा आधार घेतला आहे.

**प्राचीन कालखंडातील स्त्रीयांचे सामाजिक स्थान**:

प्राचीन भारताच्या गौरवशाली, उज्जवल इतिहासाचा अभ्यास करता असे दिसते की, तत्कालीन समाजातील स्त्रीयांचे स्थान लक्षात येते. अंदाजे इ.स. पूर्व 2000 ते 1400 हा आर्यांचा आगमनाचा काळ मानला गेला. भारत वर्षात आर्यांचे पवित्र ग्रंथ वेदासारख्या अतिप्राचीन संहितात स्त्रीयांना दिल्या जाणाऱ्या सन्माननीय स्थानाचे उल्लेख आहेत. वैदिक काळाच्या पूर्वाधात स्त्रीला समाजात महत्वाचे स्थान होते. विवाहामुळे तीला कुटुंबात सम्राज्ञीपद दिले जाई. जैमिनीच्या पूर्व मिमांसेनुसार स्त्रीला वारसाधिकार व यज्ञाधिकार दिलेले दिसतात. ज्ञानप्राप्तीकरीता स्त्रीया अविवाहित राहिल्याचे उल्लेख प्राचीन ग्रंथात मिळतात एवढेच नव्हे तर तत्कालीन राजकारणात स्त्रीला सन्मानाचे स्थान होते. वैदिक काळाच्या उत्तरार्धात स्त्रीयांच्या शिक्षणाचे दाखले मिळतात. उपनिषद काळात गार्गी, मैत्रेय यांचे नामोल्लेख आढळतात. आयुष्यभर अभ्यास करणाऱ्या ब्रम्हवादिनी स्त्रियांबद्दल वाचायला मिळते. पुराण काळात कैकेयी, मंथरा, राजनीतीशी संबंधीत होत्या. द्रोपदी, कुंती महाभारतातील राजनितीच्या केंद्रस्थानी होत्या. पुढे स्त्रीयांच्या अधोगतीला सुरवात झाली. या अधोगतीची विविध कारणे आहेत. त्यामध्ये परकीय आक्रमणे हे प्रमुख कारण आहे. तरी प्राचीन भारताचा इतिहास बघितल्यास असे लक्षात येते की, अशा अनेक महान स्त्रीया होत्या की, ज्यामुळे आपली मान अभिमानाने उंचावते. चौथ्या शतकातील चंद्रगुप्ताची मुलगी, प्रभावती, सातव्या शतकातील चालुक्य वंशातील विजय भट्टारिका या स्त्रीयांनी समस्त भारतीय समाजव्यवस्थेची मान स्वाभिमानाने उचं ठेवण्याचे काम केले. पुढे इस्लामचा भारतात प्रवेश झाला त्यामुळे भारतीय स्त्रीयांना स्वत:च्या अस्तित्वासाठी सतत संघर्ष करावा लागला.

पुढे समाज सदाचरण नीतीमत्ता या बाबतीत अधिकच कर्मठ बनत गेला. पुरुषप्रधान समाजामध्ये महिलांनी शुद्ध, सदाचारी नीतीमान राहिले पाहिजे यावर जोरदार भर देण्यात आला. धार्मिक अधिकार नष्टे केले. परिणामी त्यांचा बेदाध्यायधिकार संपला व त्याचे उपनयन होईनासे झाले त्यामुळे शिक्षण खुंटले. पतिव्रत्य हा स्त्रीचा सदगून ठरवून सतीप्रथा, विधवा, केशनपन, बहूपत्नी, विधवा, पुनर्विवाह, घटस्फोट, नियोग, अनुलोम विवाह, प्रतिलोम विवाह अशा अनेक धार्मिक रुढी, प्रथा परंपरेच्या साखलदंडात भारतीय स्त्रीयांना डांबून ठेवले.

**मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीयांचे सामाजिक स्थान**:

प्राचीन काळाप्रमाणे मध्ययुगीन हिंदू समाजात आणि कुटुंबात पुत्राप्रमाणे कन्येच्या जन्माचे स्वागत होत नसे. कुटुंबात मुलगी जन्माला आल्यावर तिच्यावर नाराजी व्यक्त केली जात असे आणि घरामध्ये आनंदापेक्षा दुखा:चेच वातावरण जास्त असे. मुलीच्या जन्माच्या घटनेला नाराजी होण्याची अनेक कारणे होती. भारतीय समाजात कालांतराने पूर्वजांच्या पूजेला महत्व प्राप्त झाले. मात्र ती पुजा करण्याचा हक्क फक्त मुलांला मिळाल्याने मुलींना अशा पुजा अर्चापासून मुकावे लागले. परिणामी कुटुंबात मुलीपेक्षा मुलगा यास वारसदाराचे महत्व प्राप्त झाले. तत्कालीन हिंदू समाजामध्ये बालविवाह पद्धत रुढ होती. विधवा विवाहास बंदी होती. समाजात आंतरजातीय विवाहांना विरोध होता. त्यामुळे मध्ययुगीन हिंदू समाजामध्ये आंतरजातीय विवाह वर्ज्य होते. मध्ययुगीन काळात सतीची पद्धत सुरु होती. पतीच्या निधनाबरोबर पत्नीला त्याच्या चितेबरोबर जाळून मारण्यात येत असे.

त्यामुळे मुलीच्या आई वडिलांना खूप दुख: भोगावे लागत असते. त्यामुळे मध्ययुगीन समाजात अशी भावना वाढीस लागली की, कुटुंबात मुलगी जन्मास येऊ नये आणि मुलगी जन्मास आलीच तर ती त्या कुटुंबावरील एक मोठी आपत्तीच मानली जाई.

मध्ययुगीन भारतात सामान्य स्त्रीयामध्ये शिक्षणाचा पूर्णत: अभाव होता. त्यामुळे सामान्य स्त्रीवर्गात अंधश्रद्धा, दांभिकपणा इत्यादींचा फैलाव झाला होता. स्त्री-शिक्षण फक्त उच्च वर्गातील स्त्रीवर्गासाठी मर्यादित बनले होते. शिक्षणाने विचारी बनलेल्या स्त्रीयांना समाज सन्मानाने वागवित असे परंतु अशा स्त्रीयांची संख्या अत्यल्प अशी होती.

**आधुनिक भारतातील स्त्रीयांचे स्थान**:

भारतामध्ये सत्तेच्या स्थापनेनंतर ज्या सुधारणा घडून आल्या त्याचे संपूर्ण भारतीय समाजजीवनावर परिणाम घडून आले. स्त्री जीवनही त्यास अपवाद राहिले नाही. वैचारीक जागृतीने प्रचलित भारतीय समाजातील अनेक अनिष्ठ, प्रथा, रुढी, वंदने यावर जोरदार प्रहार केले. व त्यातील फोलपणा समाजपुढे मांडला. पाश्चात्यामुळे स्त्री जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदलला. शिक्षण संस्थांची स्थापना करण्यात आली. इंग्रजीतून शिक्षण दिले जाऊ लागले. स्त्री शिक्षणावर भर दिला जाऊ लागला. स्त्रीयांवर होणाऱ्या अमानुष अन्याय अत्याचारा विराधात समाज सुधारकांनी जोरदार आवाज उठवून समस्त भारतीय नारी जातीस जागृत केले. बंगालमध्ये आत्मीय सभेने स्त्री शिक्षणाची गरज प्रभावीपणे मांडली. सतीबंदीस ब्रिटीशांनी पुनर्विवाह करावा यासाठी चळवळ सुरु केली. स्त्रीयांना मानवी जीवन जगण्याचे स्वातंत्र्य असावे हा विचार जोर धरु लागला. महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी समाजविरोध सहन करुन स्त्री शिक्षणाचे मोठे कार्य केले.

भारतीय स्त्रीला पुरुषी गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी महात्मा फुले यांनी क्रांतीकारक कार्य केले. पुरुषांनी व धर्मसत्तेने स्त्रीयांवर लादलेली गुलामगिरी, रुढी, प्रथा व परंपरा यातून त्यांची सुटका व्हावी म्हणून फुल्यांनी स्त्रीयांच्या सर्वांगीन सुधारणेचा विचार मांडला. त्यांनी केशवपन, पुर्नविवाहबंदी, बालविवाह, बाल जरठ विवाह या अनिष्ठ चालीरिती विरुद्ध लढा देऊन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.

**समारोप**:

अशाप्रकारे भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रीयांचे स्थान राहिले असून मध्ययुगीन व प्राचीन काळखंडामध्ये सामाजिक व कुटुंब जीवनात अत्यंत महत्वाचे व जबाबदारीचे स्थान असलेल्या स्त्री वर्गावर धर्म व पुरुष सत्तेने अमानुष्य अन्याय अत्याचार केले. माणसासारखा माणूस असलेल्या स्त्रीस माणसासारखे जीवन भारतीय समाजव्यवस्थेने जगू दिले नाही. बटिक, मोलकरीन, दासी व भोगवस्तू म्हणनूच लि वागणूक दिली गेली. त्यांना स्वातंत्र्य, समता, वारसा हक्क, आर्थिक अधिकार व शिक्षण या हक्कापासून कायम वंचित ठेवले. आधुनिक काळखंडामध्ये मात्र ब्रिटीशांनी सुरु केलेल्या शिक्षणाच्या माध्यमातून समस्त स्त्रीवर्गाला शिक्षित करुन जागृत केले आणि मानवी जीवन जगण्याचे स्वातंत्र्य दिले. विशेषत: महात्मा फुले, डॉ. आंबेडकर रमाबाई रानडे, डॉ. आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले, डॉ. रखमाबाई, ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे आदींनी स्त्रीयांचे विविध प्रश्न हाती घेऊन त्यावर जनमत जागृत करुन तोडगा काढला. स्त्रीयांच्या विकासासाठी सुरु झालेली चळवळ पुरुषवर्गाशी संघर्ष करण्यासाठी नव्हती तर ती स्वावलंबनाचे धडे शिकण्याची होती असा विचार पुढे आला. आज भारतीय स्त्रीया पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून, चूल आणि मूल या स्थितीतून बाहेर पडून विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करताना दिसत आहेत असे असले तरी भारताच्या ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी पूर्वीसारखीच परिस्थिती असल्याचे दिसते. दिवसा ढवळ्या स्त्रीयावर अन्याय, अत्याचार होताना दिसत आहे. देवदासी, वाघ्या मुरळी या सारख्या प्रथा देशात आजही राजरोसपणे सुरु असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**:

1. प्राचीन व मध्ययुगीन काळखंडामध्ये स्त्रीयांवर अमानुष अत्याचार होत होते त्या धार्मिक रुढी, प्रथा, परंपरेच्या बळी पडल्याचे दिसून आले.
2. आधूनिक कालखंडामध्ये कडक कायद्याच्या अंमलबजावणीमुळे सुद्धा स्त्रीयांवर अत्याचाराचे व बलात्काराचे प्रमाण वाढले आहे.
3. देशामधील ग्रामीण व शहरी भागामध्ये अनेक स्त्रीय धार्मिक व सामाजिक बंधनाच्या बळी ठरल्याच्या दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


1. भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, औरंगाबाद 1978.
2. भारतीय स्त्री जीवनाची वाटचाल, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक
3. डॉ. कडू मोहिनी, भारतीय राजकारणातील स्त्रिया (चरित्रे आत्मचरित्रे), वियज प्रकाशन, नागपूर, 2008.
4. SANKRUTI –Women Empowerment and Globalization – 11th December – 2021, one day Conference.
5. SOUVENIR – Published, Mechanism for The Protection of Human Rights, a Two day national Seminar & S.G.M. College, Karad.